आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१९ मार्च २०२४ - मंगळवार

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आज सकाळी नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची भेट घेतली. अमित शाह यांच्या घरी झालेल्या भेटीच्या वेळी भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे आणि अमित ठाकरे उपस्थित होते. राज ठाकरे महायुतीमध्ये सहभागी झाले तर त्यांचं स्वागत आहे, अशी प्रतिक्रिया भाजपाच्या अनेक नेत्यांनी दिली आहे. राज ठाकरे महाराष्ट्र, मनसे आणि हिंदुत्वाच्या हिताचा निर्णय घेतील आणि सर्व मनसैनिकांना तो मान्य असेल अशी प्रतिक्रिया मनसे नेते संदीप देशपांडे यांनी आज मुंबईत पत्रकारांशी बोलताना दिली.

**<><><><><>**

शिवसेनेच्या खासदारांची बैठक आज मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातल्या घरी होणार आहे. यात लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाविषयी चर्चा होण्याची शक्यता आहे. पक्षाचे अनेक विद्यमान खासदार या बैठकीला उपस्थित राहणार आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांची भेट घेतल्याचं वृत्त आहे.

**<><><><><>**

महाविकास आघाडीतल्या २ प्रमुख पक्षांवरचा आपला विश्वास उडाला असला, तरी काँग्रेसला मात्र ७ लोकसभा मतदारसंघामधे पाठिंबा देणार असल्याचं वंचित बहुजन आघाडीनं स्पष्ट केलं आहे. याबाबत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांना पत्र लिहिलं आहे. आपल्या पक्षाला न बोलवता आघाडीच्या बैठका आणि चर्चा होत

आहे. ज्या बैठकांना बोलावलं त्या बैठकांमधे आमच्या प्रतिनिधीचं म्हणणं ऐकायला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं नकार दिला. मात्र भाजपा सरकारचा पराभव करणं हाच वंचित बहुजन आघाडीचा प्रधान हेतू कायम असल्यानं काँग्रेसला पाठिंबा द्यायचा निर्णय पक्षानं घेतला आहे. त्यामुळे काँग्रेस राज्यात लढवणार असणाऱ्या सात मतदार संघांची नावं आपल्याला कळवावीत, असं या पत्रात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

**रायगड** लोकसभा मतदार संघात निवडणुकीच्या कामासाठी साडे १३ हजार कर्मचाऱ्यांची नेमणूक केली असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे. रायगडमध्ये एकूण १६ लाख ५३ हजार ९३५ मतदार असून त्यात महिला मतदारांची संख्या जास्त आहे.**पालघर** जिल्ह्यातल्या सहा मतदारसंघासाठी ४ हजार ७७७ बॅलेट युनिट, ३ हजार १४४ कंट्रोल युनिट, ३ हजार ३५७ व्ही. व्ही. पॅट मशीन उपलब्ध आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्याला लागून असलेल्या महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांच्या सीमांवर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे, अशी माहिती प्रशासनानं दिली आहे.

**<><><><><><>**

काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीनं आज पक्षाच्या जाहीरनाम्यावर चर्चा केली. या जाहीरनाम्यात शेतकरी, युवक, महिला, कष्टकरी आणि आरक्षण या मुद्द्यांवर भर दिला जाईल, असं पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी म्हटलं आहे.

नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत माजी अध्यक्ष सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी, पी. चिदंबरम यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते सहभागी झाले होते.

लोकसभेसाठी आणखी काही उमेदवार जाहीर करण्यासाठी पक्षाच्या निवडणूक समितीची आज संध्याकाळी बैठक होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे आयकर विभागाने निवडणुकांच्या काळात होणाऱ्या पैशांच्या गैरवापरावर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक विशेष नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. हा नियंत्रण कक्ष दिवसाचे 24 तास आणि आठवड्याचे सातही दिवस कार्यरत असेल. नागरिक त्यांच्या तक्रारी फोन कॉल, व्हॉट्सॲप किंवा ईमेलद्वारे नोंदवून कक्षाला माहिती देऊ शकतात. संपर्कासाठी टोल फ्री क्रमांक आहेत 1800-233-0353 आणि 1800-233-0354. नागरिकांना 9420244984 या व्हॉट्सॲप क्रमांक वर तसंच pune.pdit.inv@incometax.gov.in या ईमेल आयडी वरही तक्रार नोंदवता येईल.

<><><><><>

गडचिरोलीत अहेरी तालुक्यातल्या रेपनपल्लीजवळच्या कोलामार्का जंगलात आज पहाटे झालेल्या चकमकीत चार नक्षलवादी ठार झाले. यापैकी एकजण नक्षलांच्या तेलंगणा विभागीय समितीचा सचिव तर दुसरा क्षेत्र सचिव होता. दोघांवर ३६ लाखाचे बक्षीस होतं. पोलिसांनी त्यांच्याकडची पिस्तूलं, कार्बाईन आणि इतर, साहित्य ताब्यात घेतलं आहे. या परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र केल्याची माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

<><><><><>

अंमली पदार्थांच्या विक्रीच्या गुन्ह्यासह अन्य गुन्हे दाखल असलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातल्या दोन सराईत गुन्हेगारांवर पोलिसांनी काल हद्दपारीची कारवाई केली

आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अशा गुन्हेगारांना हद्दपार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकानीं दिल्या होत्या. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

//<><><><><><>//